# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ५३
# सभा क्र.८०, दिनांक २०/०३/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक तहकूब सभा (शुक्रवार, दि. १७/०३/२०२३ रोजीची) सोमवार, दि. २०/०३/२०२३ रोजी, दुपारी ४.०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**कार्यपत्रिकेवरील विषय**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचेकामकाजाचाआढावा**

**विषय क्र.१९२३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे दि. ०१/०१/२०२३ ते दि. ३१/०१/२०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/९७०६, दि. ८/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१९२४**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/ नगररोड (वडगांव शेरी) क्षेत्रिय कार्यालयांकडील फेब्रुवारी २०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१ यांचे जा.क्र. उप–१/९६८९, दि. १३/३/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१९२५**

पुणे महानगरपालिका क्षेत्रीय आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरूड बावधन या क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे फेब्रुवारी २०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/१५६४, दि. १५/३/२०२३चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.१९२६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. २, कार्यालय अधिनस्त असलेल्या औंध–बाणेर क्षेत्रिय , शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरूड – बावधन कार्यालयाकडील कामांच्या दि. ०१/०२/२०२३ ते दि. २८/२/२०२३ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/१५४४, दि. ०९/०३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.१९२७**

शिल्पा सोसायटी ते सिग्मा १ सोसायटी रस्ता व एम.आय.टी रस्ता विकसित करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिद्धीविनायक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ८३,९३,१५२/–पेक्षा७.५०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७७,६३,६६५=६० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जीएसटी र.रू. १५,१०,७६७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ९६,०८०/– अशी एकूण र. रू. ९३,७०,५१२=६० पर्यंत अदा करणेस अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१५४९, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९२८**

सिंहगड मुख्य रस्तापु.ल. देशपांडे उद्यानासमोर कल्व्हर्ट विकसित करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.तुकाराम देवप्पा पाटील यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८२,५०,७६२/–पेक्षा२५.११% कमी ) असल्याने

त्यांचेकडून र.रू. ६१,७८,९९५=६६ अधिक जीएसटी र.रू. १४,८५,१३७/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. ९६,८५२/– अशी एकूण र. रू. ७७,६०,९८४=६६पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस /कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१५५०, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९२९**

फुरसुंगी गावामध्ये दैनंदिन खेपा टॅंकरने पाणीपुरवठा करणे सन २०२२–२३ (भाग–३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ३,९९,९६,३००/– पेक्षा८.०००% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३,६७,९६,५९६/– चे काम उपलब्ध रक्कमेपर्यंत करून घेणेसाठी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५२, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३०**

नव्याने समाविष्ट ११ गावांपैकी आंबेगांव खुर्द व कार्यकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा क्रमांक १ अंतर्गत येणाऱ्या विविध भागात मागणीनुसार टॅंकरने पाणीपुरवठा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. राजा कंस्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७९,९९,६४४/– पेक्षा१.००%कमी (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७९,१९,६४७=५६ चे काम उपलब्ध रक्कमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५३, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३१**

स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र. १ यांच्या अखत्यारीत येणाऱ्या नव्याने समाविष्ट धायरी, रायकर मळा गावठाण व इतर विविध भागात मागणीनुसार टॅंकरने पाणीपुरवठा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. राजा कंस्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७९,९९,३०५/–पेक्षा१.००%कमी (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७९,१९,३११=९५ ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५४, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३२**

नव्याने समाविष्ट २३ गावांपैकी पिसोळी, भिलारेवाडी व कार्याकारी अभियंता स्वारगेट पाणीपुरवठा विभाग क्र. १ अंतर्गत येणाऱ्या विविध भागात मागणीनुसार टॅंकरने पाणीपुरवठा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राजा कंस्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७९,९९,१२८/–पेक्षा१.००%कमी (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७९,१९,१३६=७२ ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५५, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३३**

कार्यकारी अभियंता क्र.१ स्वारगेट पाणीपुरवठा अंतर्गत येणाऱ्या धनकवडी, बालाजीनगर व इतर भागात मागणीनुसार टॅंकरने पाणीपुरवठा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. राजा कंस्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७९,९९,१११/– पेक्षा१.००%कमी (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७९,१९,११९=८९ ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५६, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३४**

कार्यकारी अभियंता क्र.१ स्वारगेट पाणीपुरवठा अंतर्गत येणाऱ्या कात्रज, अप्पर व इतर विविध भागात मागणीनुसार टॅंकरने पाणीपुरवठा करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. राजा कंस्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७९,९९,७५५/– पेक्षा१.००%कमी (तडजोडीने)) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७९,१९,७५७=४५ ची निविदा मान्य करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५७, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३५**

नवीन लष्कर जलकेंद्र येथे फिल्टर बेड रीग्रेडेशन करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.डेक्कन एन्टरप्रायजेस, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ८४,७३,०३५/– पेक्षा२.०००%कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८३,०३,५७४=३० अधिक १८% जीएसटी र.रू. १४,९४,६४३=३७ असे एकूण र.रू. ९७,९८,२१७=६७पर्यंत काम करून घेणेस व

त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५८, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३६**

राजीव गांधी पंपींग स्टेशन येथे आगम पंप केदारेश्वर पंपासाठी रोटेटिंग असेंब्ली पुरविणे बसविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. डेक्कन एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. २५,४१,८५५/– पेक्षा १.००% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रू. २५,१६,४३६=४५ अधिक प्रचलित दराने येणारा जीएसटी (१८%) र.रू. ४,५२,९५८=५६ असे एकूण र. रू. २९,६९,३९५=०१ पर्यंत मान्यता मिळणेस व बिलापोटी आवश्यक त्या वजावटी करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५५९, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३७**

वारजे जलकेंद्र येथे फिल्टर रिग्रेडेशनची विविध कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.संताजी कदम यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. १,६५,४५,७८१/– पेक्षा १.१०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,६३,६३,७७७=४० अधिक प्रचलित दराने येणारा जीएसटी (१८%) र.रू. २९,४५,४७९=९३ असे एकूण र. रू. १,९३,०९,२५७=३३ पर्यंत मान्यता मिळणेस व बिलापोटी आवश्यक त्या वजावटी करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५६०, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३८**

प्रभाग क्र. १२ माथवड भाजी मंडई येथील उर्वरित स्थापत्य विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.तेजदर्शन इन्फ्रा प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७५,९४,९२२/–पेक्षा०.१५% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ७५,८३,५२९=६२ अधिक जीएसटी र.रू. १३,६७,०८६/– अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रू. २१,२९०/– अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १५,१३३/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१५६१, दि. १४/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९३९**

नवीन लष्कर जलकेंद्र येथे क्लेरीफायरसाठी टेफ्लॉनरेड पुरविणे व बसविणे कामीटेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. समर्थ इलेक्ट्रिकल्स इंजिनिअर्स ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ४२,३७,२३८/– पेक्षा०.९५०% कमी ) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४१,९६,९८४=२४ अधिक (१८%) जीएसटी र.रू. ७,५५,४५७=१६ असे एकूण र. रू. ४९,५२,४४१=४० पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५६२, दि. १४/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९४०**

ऊरूळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणेसन २०२२–२३ (भाग–३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या२ टेंडर्सपैकी ठेकेदार एन.वाय. शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. २,९९,८७,६००/– पेक्षा८.००१ % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २,७५,८८,२९२=१२ चे काम उपलब्ध रकमेपर्यंत करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१५६३, दि. १४/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९४१**

पुणे मनपाच्या मोटार वाहन विभाग गुलटेकडी अंतर्गत असलेल्या हेवी (HGV) व लाईट (LMV)मोटार व्हेईकल (ट्रान्सपोर्ट) संवर्गातील वाहनांचे आर.टी.ओ. पासींग विषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. प्लॅनेट ऑटो एजन्सी, पुणे व मे. अब्बास स्प्रिंग, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( पुगपर.रू. ८४,७४,५७६=२७ + GST पेक्षा १६ %कमी) असल्याने त्यांचेकडून परिमाण विभागून त्यांचे टेंडर दराने कामे करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त ( ई ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१५६९, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१) मे. प्लॅनेट ऑटो एजन्सी, पुणे व मे. अब्बास स्प्रिंग, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडरदराने (पूर्वगणनपत्रक रक्कमेपेक्षा १६% ने कमी) प्रत्येकी रक्कम रू. ३५,५९,३२२=०३ यानुसार एकूण र.रू. ७१,१८,६४४=०७ (+) १८ %GST Extra याप्रमाणे रू. ८४,००,०००/– (रू. चौऱ्याऐंशी लाख फक्त)पर्यंत आवश्यकतेनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस.

२) मे. प्लॅनेट ऑटो एजन्सी, पुणे व मे. अब्बास स्प्रिंग, पुणे यांचेकडून निविदाचे ब पाकीट उघडल्यापासून म्हणजेच दि. १३/०१/२०२३ पासून केलेल्या कामापोटी पश्चात मान्यता मिळणेस.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९४२**

भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत शंकरशेठ रोड कर्मशाळेजवळ आकांक्षी (aspirational) स्वच्छतागृह उभारणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.व्ही. गणपती कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. २९,८७,७७४/– जीएसटी वगळता पेक्षा २३.२५०%कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. २२,९३,११६=६४ अधिक १८% जीएसटी र.रू. ५,३७,७९९/– अधिक टेस्टिंग चार्जेस र.रू. १३,७५५/– अधिक कन्सल्टंट चार्जेस र.रू. २९,८७८/– अधिक वर्क इन्शुरन्स र.रू. २९,८७८/– अधिक लेबर इन्शुरन्स र.रू. २९,८७८/–रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त ( ई ) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१५७०, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९४३**

तुकाई टेकडी मंदिर येथील सिमाभिंत व तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आर्यन कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ५३,१३,५६४/– पेक्षा २८.९९०%कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ३७,७३,१६१=७९ अधिक टेस्टिंग चार्जेस र.रू. १,७९,६२७/– अधिक १८%जीएसटी र.रू.९,५६,४४२/– पर्यंतचे काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति. महापालिका आयुक्त ( ई ) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१५७१, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>मागील सभेचे विषय</u>**

**विषय क्र.१९४४**

१५ व्या वित्त आयोगांतर्गत बिबवेवाडी रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे फुटपाथ आणि सायकल ट्रॅकचे बांधकाम करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एस एण्ड बिल्डकॉन प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. ७,२७,५३,१५८/– पेक्षा १.००%कमी )असल्याने त्यांचेकडून र.रू. ७,२०,२५,६२६=४२ पर्यंत काम करून घेणेस अधिक जीएसटी र.रू. १,३०,९५,५६८/– पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू.८,५६,०७३/– पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २,३६,६००/– (असे एकूण र. रू. ८,६२,१३,८६७=४२) पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील विशेष भाववाढ व सर्व साधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१४०४, दि.१७/२/२०२३ चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १०/३/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९४५**

प्रभाग क्र.१६ (स्विकृत सदस्य) पुरातन नागेश्वर मंदिर (सोमवार पेठ) येथील उर्वरित कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आर.पी.चित्रोडा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र. रू. २८,९५,३३०/–पेक्षा२ %कमी तडजोडीने ) असल्याने त्यांचेकडून र.रू.२८,३७,४२३=४०पर्यंत अधिक जीएसटी र.रू. ५,२१,१५९/– पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१४२१, दि. २०/२/२०२३ चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १०/३/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**<u>संकीर्ण</u>**

**विषय क्र.१९४६**

पुणे पेठ कर्वेनगर स.नं.९ हि.नं.६अ/२०बी/६बी/७अ २/७बी/८अे/२ येथील २ टेनिस कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट व क्रिकेटचे मैदान (क्षेत्रफळ २७४४.९६ चौ.मी.) लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेस मा. स्थायीसमितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबतमा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/१४८०; दि.२८.०२.२०२३ चे पत्रावरझालेला मा. शहरसुधारणा समिती ठराव क्र. १४७, दि.३/३/२०२३ चा विचारासाठी.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९४७**

पुणे पेठ सदाशिव पेठ सि.स.नं.८०२ शनिपार येथील मनपा इमारतीच्या तळमजल्यावरील गाळा क्र.३ हा ३ वर्ष कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर देणे स मा. स्थायीसमितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत (क्षेत्रफळ १४.८६ चौ.मी.)मा.महापालिका

आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/१४८२; दि.२८.०२.२०२३ चे पत्रावरझालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४८, दि.३/३/२०२३ चा विचारासाठी.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९४८**

पुणे गंज पेठ टिंबर मार्केट प्लॉट नं.१११ च्या उत्तरेस असलेल्या २०'x९०' मापाच्या मोकळया जागेतील २७.८८ चौ.मी. जागा समाज उपयोगासाठी देणे स मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत (क्षेत्रफळ १६७.२९ चौ.मी.)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१२२२; दि.१३.०१.२०२३ चे पत्रावर झालेला मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १५०, दि.३/३/२०२३ चा विचारासाठी.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९४९**

ऋ-२० परिषदेचेअनुषंगाने महानगरपालिकेमार्फत करण्यातआलेल्याकामाकरिताअंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतूदर.रू. २,२१,६३,७५०/- खालीलप्रमाणेवर्गीकरणाद्वारेउपलब्धकरूनदेणेसमा. स्थायीसमितीमार्फत मा. मुख्य सभेचीमान्यतामिळणेबाबत मा. महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र. मआ/श.अ.अ/१५४८, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक,<br>शहरअभियंताकार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>१) ९-थर्ड पार्टी ॲश्युरन्स करिता सल्लागार फी देणे<br>बजेटकोड नं. ठ्ए२३अ११२. | १,६३,३५,००० | --- |
| २) विकासआराखडाव व मायक्रोफिल्म करणेबजेटकोड नं- ठ्ए२३अ१२१. | ५८,२८,७५०/- | --- |
| <u>नवीनसुचविलेलीकामे</u><br>शहरअभियंताकार्यालय, पुणे महानगरपालिका,<br>१) जे डब्लू मॅरिएट येथेरोजीभारतातीलमहानगरपालिकेतीलआयुक्त यांची परिषदआयोजित करणे. | | ६,६३,७५०/- |
| २) ऋ-२० परिषदेच्याअनुषंगानेसुशोभिकरणकरणे, स्वागत कमानी बोर्ड लावणे, स्वागतकरणे व इतरकामे. ( क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यातआलेली विविधकामे ) | | १,४०,००,०००/- |
| ३) ऋ-२० परिषदेच्याअनुषंगानेआकाशवाणी वर जाहिरातकरणे. | | १०,००,०००/- |
| ४) ऋ-२० परिषदेच्याअनुषंगानेहोर्डिंग्ज लावणे व इतरजनतासंपर्क कार्यालयामार्फत कामेकरणे | | ४०,००,०००/- |
| ५) ऋ-२० परिषदेच्याअनुषंगानेवर्तमानपत्रात प्रसिद्धीदेणे. | | २५,००,०००/- |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५०**

इ. ९ वी ते इ.१२ वीसाठी कंत्राटी पद्धतीनेघेण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या मानधनासाठी कमीपडणारी र.रू. ५२ लक्षखालीलप्रमाणेवर्गीकरणाद्वारेउपलब्धकरूनदेणेसमान्यतामिळणेबाबत मा. महापालिकाआयुक्त यांचेजा.क्र. मआ/माध्यमिक व तांत्रिक /१५५१, दि. १३/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक,<br>शिक्षणाधिकारी/माध्यमिक व तांत्रिक शिक्षणकार्यालय , पुणे महानगरपालिका, मनपामाध्यमिक शाळांमधील विद्यार्थी विद्यार्थीनींना मोफत गणवेशदेणे. ठ्ए१३अ१२६. | ५२ लक्ष | --- |
| नविनसुचविलेलेकाम<br>शिक्षणाधिकारी माध्यमिक व तांत्रिक शिक्षणकार्यालय,<br>इ. ९ वी ते इ.१२ वीसाठी कंत्राटी पद्धतीनेघेण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या मानधनासाठीठ्ए१३अ१५७. | | ५२ लक्ष |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५१**

सन २०२१–२२ या आर्थिक वर्षातील पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण मा. मुख्य लेखापरिक्षक यांचेकडून प्रमाणित झाल्याने संचलन तुटीपोटी देय ठरणारी उर्वरित रक्कम PMPML संस्थेस आदा करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१५६५,दि. १५/३/२०२३ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेकडून PMPML संस्थेस देय ठरणारी उर्वरित रक्कम रू. २१,०६,२०,१४१/– पैकीसन२०२२–२३ च्या अंदाजपत्रकातील'' RE58A101A PMPML च्या संचलनामधील तुटीपोटीचा हिस्सा'' या अर्थशीर्षकामधून र.रू. १७,२६,००,१४१/– व RE58A101B ''PMPML संस्थेस मोफत/सवलतीचे बसपासपोटी अदा करावयाची रक्कम '' या अर्थशिर्षकामधून र.रू. ३,८०,२०,०००/– खर्ची टाकणेस.

२) पुणे महानगरपालिकेकडून PMPML संस्थेस देय ठरणारी उर्वरित रक्कम रू. २१,०६,२०,१४१/– मधून मुद्रणालयाची थकबाकीर.रू. ४६,५१,८००/– व पाणीपुरवठा विभागाकडीलर.रू. ३,३०,२४,२४१/– समायोजित करणेस.

३) वरीलप्रमाणे मुद्रणालय व पाणीपुरवठा विभागाची थकबाकी रक्कम र.रू. ३,७६,७६,०४१/– समायोजनकेल्यास pmpml संस्थेस रक्कम रू. १७,२९,४४,१००/– ( अक्षरी रक्कम रूपये ङ्क सतरा कोटी एकोणतीस लाख चव्वेचाळीस हजार शंभर रूपये फक्त ) PMPML संस्थेसआदा करणेस.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५२**

पुणे–सोलापूर नॅशनल हायवे वर (छक्क-९) बांधण्यात आलेल्या हडपसर गाव ते गाडीतळ उड्डाणपुलाच्या दुरूस्ती कामाचा एकूण खर्च र.रू. २,९७,९५,१२७/– इतकाझालाआहे. ( दुरूस्तीकामेर.रू. २,५८,२२,३११/– अधिक १२%ऋढ्ढर.रू. २८,९८,६७८/– अधिक कामाचे सल्लागार यांची २ %दराने फी र.रू. ५,१६,४४६/– अधिक टेस्टिंग चार्जेस पोटी र.रू. ५,५७,६९२/– ) हा संपूर्ण तपशील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातसोबत जोडलेल्या परिशिष्ट क मध्ये समाविष्ट केला असून सदरचा खर्च सन २०२१–२२ चे मान्य दरपत्रकानुसार परीगणित करण्यात आला असून सदरची वस्तुस्थिती मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/१५६६, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५३**

पुणे शहराची वाढ लक्षात घेता व भविष्यातील काळाची गरज पाहता शहरात होत असलेली वाहतूक कोंडी कमी करणेसाठी तसेच भविष्यातील गरजा लक्षात घेता, शहरातील वाहतूक व्यवस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने श्री. निखिल मिजार (ट्रान्सपोर्ट प्लॉनर) यांची सद्यस्थितीतील नेमणूक सहा महिने कालावधी दि.०४/०५/२०२३ रोजी संपत असून त्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिने मुदतीसाठी नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१५६७, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५४**

पंतप्रधान – पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेअंतर्गत लाभ्यार्थ्यांचे अर्ज क्षेत्रिय कार्यालय स्तरावरून भरून घेणेकरिता सह्याद्री इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, निगडी प्राधिकरण , पुणे या संस्थेस काम देणेस व या कामासाठी आवश्यक र.रू. ४१,७३,८४०/– खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सविवि /१५६८, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका मार्फत शासनाची'' पंतप्रधान – पथ विक्रेताआत्मनिर्भर निधी'' योजना राबविण्याकरिता समाज विकास विभागाकडील सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकातील ४ क युवक कल्याणकारी योजना निधी अंतर्गत FE14D1 53 ( स्टार्ट अप, मुद्रा, कौशल्य विकास योजनांच्या जनजागृतीसाठी कार्यक्रमांचे आयोजन ) या अर्थशिर्षकामधून रक्कम रू. ४१,७३,८४०/– खालीलप्रमाणे वर्गीकरण तक्त्यानुसार उपलब्ध करून देणेस.

२) '' पंतप्रधान – पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी'' या योजनेचे काम करणेकरिता सह्याद्री इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, निगडी प्राधिकरण, पुणे या संस्थेला प्रतीलाभार्थी रक्कम रू. ६८/– या दराने काम देणेस त्यापोटी प्रत्यक्ष होणारी रक्कम संस्थेस अदा करणेस.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,<br>समाज विकास विभाग<br>४ क युवक कल्याणकारी योजना निधी १. FE14D153 स्टार्ट अप, मुद्रा, कौशल्य विकास योजनांच्या जनजागृतीसाठी कार्यक्रमांचे आयोजन. | ४१,७३,८४०/– | --- |
| **सुचविलेले काम**<br>समाज विकास विभाग<br>ग–१, समाज विकास विभाग<br>१. RE14C115<br>राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना राबविणे. | --- | ४१,७३,८४०/– |

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९५५**

रजपूत झोपडपट्टी एरंडवणा येथील ड्रेनेजलाईन चोकअप होऊन झोपडपट्टीत पाणी घुसत असल्याने त्या ठिकाणी नव्याने ६०० मिमी व्यासाची ड्रेनेजलाईन टाकणे या कामाचे महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये काम सुरू करून घेण्याची बाब तसेच खालील बाबींस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेसबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि. ३/१५७२, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क)नुसार ठेकेदार मे. आकाश कन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा.श्री. सुरेश तम्मा जाधव यांना सदर कामास पूर्वी मा.महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.६/३४३, दिनांक ०४/०८/२०२२ ने दिलेल्या मान्यतेनुसार अतिरिक्त करण्यात आलेल्या कामाचे बिल अद ाकरणेस.
२. वारजे-कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत रजपूत झोपडपट्टी एरंडवणा येथील ड्रेनेजलाईन चोकअप होऊन झोपडपट्टीत पाणी घुसत असल्याने त्या ठिकाणी नव्याने ६०० मिमी व्यासाची ड्रेनेजलाईन टाकणे या अतिरिक्त केलेल्या कामाचे बिल ( GST व अन्य करांसहित) व सदरचे बिल महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (क) अंतर्गत करावयाच्या कामांसाठी खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस.

   अर्थशीर्षक :- सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक - ZE16B102/D2-407 पाणीपुरवठा व जलोत्सरण विभागाचे भांडवली व खास निधी जमा व खर्चाचेअंदाजपत्रक, यादी क्र.डी२, शहरामध्ये मलवाहिन्या विकसित करणे. (पान क्र. ३५), उपलब्ध तरतूद र.रू. ५.०० कोटी पैकी उर्वरितर.रू. २४,७८,९७५=५६ .

**निर्णय – सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९५६ त्वर्य**

नवीन लष्कर जलकेंद्र येथे पंपाचे व बेडचे व्हॉल्व्ह बदलणे व तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. श्री. समर्थ इलेक्ट्रिकल्स इंजिनिअर्स अॅन्ड कॉन्ट्रेक्टर्स, पुणेयांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ४२,३०,२१४/-पेक्षा १%कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४१,८७,९११=८६अधिक १८%जीएसटी र.रू. ७,५३,८२४=१३ असे एकूण र.रू. ४९,४१,७३५=९९ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/१५७३, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९५७ त्वर्य**

वारजे जलकेंद्र येथे एसएनडीटी झोनकरिता नव्याने स्टँडबाय पंपसेट बसविणे व इतर तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विश्वराज इन्व्हारमेंट प्रा.लि., नागपुर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. २५,४२,२९४/-पेक्षा ७.६०%कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २३,४९,०७९=६५अधिक प्रचलित दराने येणारा जीएसटी (१८%) र.रू. ४,२२,८३४=३३ असे एकूण र.रू. २७,७१,९१३=९८ मान्यता मिळणेस व बिलापोटी आवश्यक त्या वजावटी करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/१५७४, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९५८ त्वर्य**

लष्कर पाणीपुरवठा विभागा अंतर्गत रामटेकडी टँकरपॉइट अॅटोमेशन व तदनुषंगिक स्थापत्यविषयक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ठेकेदार मे.इलेक्ट्रोटेक एन्टरप्रायजेस, पुणे यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रू. ४८,३०,६५८/-पेक्षा१०.९२० %कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४३,०३,१५०=१५ अधिक १८%जीएसटी र.रू. ७,७४,५६७=०३ असे एकूण र.रू. ५०,७७,७१७=१८ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/१५७५, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९५९ त्वर्य**

देवाची ऊरूळी – फुरसुंगी कचरा डेपो येथे साठलेल्या बायोमायनिंग करून जागा रिक्लेम करणेच्या अनुषंगाने मा. महापालिका आयुक्त यांचे दिनांक १०/३/२०२२ रोजीचे निर्देश व मा. महापालिका आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.६/२९० दिनांक १९/७/२०२२ नुसारच्या मान्यतेनुसार झालेले काम व त्यापोटी झालेल्या खर्चाबाबत खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/१५७७, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१) देवाची ऊरूळी – फुरसुंगी कचरा डेपो येथे साठलेल्या बायोमायनिंग करून जागा रिक्लेम करणेच्या अनुषंगाने मा. महापालिका आयुक्त यांचे ठराव क्र. ६/१०१६, दिनांक १०/३/२०२२ नुसारचे निर्देश व मा. महापालिका आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र.६/२९०, दिनांक १९/७/२०२२ च्या मान्यतेनुसार दिनांक ११/०३/२०२२ ते ०९/११/२०२२ या कालावधी मध्ये मे. भूमीग्रीन एनर्जी यांचेकडून करून घेण्यात आलेल्या २,७६,७६३=६५ मे.टन लीगसी वेस्ट कचऱ्यावर प्रक्रियेच्या कामास व त्यापोटी र.रू. ६४६ प्रती मे.टन या दराने अदा करण्यात आलेल्या र.रू. १७,८७,८९,३१७=९ च्या देयकास.
२) सदर कामाकरिता घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील उपलब्ध अर्थशीर्षक CE19A178–ऊरूळी देवाची/फुरसुंगी येथे साठलेल्या कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणे (उपलब्ध तरतूद र.रू. २७.२ कोटी)या अर्थशिर्षक वरून झालेल्या खर्चास.

**निर्णय – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा.**

**विषय क्र. १९६० त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालये तसेच समाविष्ट ११ गावामधील आरोग्य केंद्रे, (दवाखाने) जलकेंद्रे, सांस्कृतिक केंद्रे, क्रिडांगणे, स्मशानभूमी, मंडई, कचरा हस्तांतरण केंद्रे, मैलापाणी शुद्धीकरण केंद्र इत्यादी ठिकाणी सुरक्षा विभागामार्फत आवश्यक नव्याने वाढीव ठिकाणासाठी ६० बहुद्देशीय कामगार उपलब्ध करून घेणेसाठी कामाची मुदत दि.१४/७/२०२२ ते ३१/८/२०२२ अखेर असून यासाठी येणारा खर्च अंदाजे रक्कम रूपये.२३,०७,७०५/– अधिक किमान वेतन व विशेष भत्ता यामध्ये होणाऱ्या वाढीसह सुरक्षा विभाग बजेटकोड RE11D130(बहुद्देशीय कामगार पुरविणे) या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेत येणार असून सदरची बाब निदर्शनास व अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/१५७८,दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र. १९६१ त्वर्य**

बिबवेवाडी येथील कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (इ.एस.आय.सी.) रूग्णालयात ६०० एल.पी.एम. क्षमतेचा ऑक्सिजन प्लांट बसविणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क)नुसार मे.व्हर्गो स्पेशालिटी प्रा.लि. मुंबई या कंपनीने रक्कम रूपये – ८०,००,०००/–+र.रू. ९,६०,०००/– (१२%जीएसटी) अशी एकूण रक्कम रूपये.८९,६०,०००/–चा प्रस्तावास मा.महापालिका आयुक्त यांनी दि. १९/७/२०२१ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार बिबवेवाडी येथील कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या (इ.एस.आय.सी.) रूग्णालयात ऑक्सिजन प्लांट बसविणे बाबतची कार्यवाही मा. स्थायी समितीमार्फत व मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/श.अ./१५७९,दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९६२ त्वर्य**

ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालयाकडील सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.२० ड मधील र.रू. १४० लक्षचे कामांच्या वर्गीकरणास मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.१/१५८०, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९६३ त्वर्य**

प्रभाग क्र.४१ मधील कोंढवा बु. स.नं. ६६ विठ्ठलराव गेनाजी टिळेकर जलतरण तलावाचे अर्धवट काम पूर्ण करणे र.रू. १५ लक्ष प्रभाग क्र. ४१ मधील स.नं. २० प्ले–ग्राऊंड अर्धवट काम पूर्ण करणे र.रू. ५० लक्ष या दोन्ही कामासाठी प्रकल्प विभागाकडील र.रू ६५ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेजा.क्र. मआ/भवन/१५८१,दि. १६/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक,भवन विभाग नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे ( PPP/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदी काठ विकसित करणे/ सुधारणा करणे) ( बजेटकोड–CE20D219/L2-11) | ६५ लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेली कामे**<br>भवन विभाग<br>१) प्रभाग क्र.४१ मधील कोंढवा बु. स.नं. ६६ विठ्ठलराव गेनाजी टिळेकर जलतरण तलावाचे अर्धवट काम पूर्ण करणे. | --- | १५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.४१ मधील स.नं. २० प्ले–ग्राऊंड अर्धवट काम पूर्ण करणे | --- | ५० लक्ष |

**निर्णय– सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९६४ त्वर्य**

ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत जी–२० चे अनुषंगाने भिंती रंगविणे हे काम तातडीने करावयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३) (क) अन्वये सुरू असलेल्या कामाची खालील बाब मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेच्या माहतीसाठी व अवलोकनार्थ आणणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.१/१५८२,दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१) मे./श्री. आर.डी.सिंग यांचेकडून जहांगीर चौक ते आर.टी.ओचौक उजवी बाजूची भिंती रंगवून चित्रे काढून सुशोभित करणे हे काम प्रत्यक्ष जागेवर पूर्ण झाले असून त्याची मोजमापानुसार व सादर केलेल्या तपशिलानुसार र.रू. १७,६०,२९८/– शासनाच्या सुधारित धोरणानुसार जीएसटी सह बिल होत असून पुणे मनपासन २०२२–२३ च्या दरपत्रकानुसार ॲटपार दराने होणारी बिल रक्कम (बजेटकोड– C171A101A)यावर तरतूद उपलब्ध करून अदा करण्यात येणार आहे व त्याचेसमवेत करारनामा करणेत येणार आहे व मे./श्री.मतिन एन्टरप्रायजेस यांचेकडून जहांगीर चौक ते आर.टी.ओ चौक डावी बाजूची भिंती रंगवून चित्रे काढून सुशोभित करणे हे काम प्रत्यक्ष जागेवर पूर्ण झाले असून त्याची मोजमापानुसार व सादर केलेल्या तपशिलानुसार र.रू.

९,२८,३५८/– शासनाच्या सुधारित धोरणानुसार जीएसटी सह बिल होत असून पुणे मनपासन २०२२–२३ च्या दरपत्रकानुसार अॅटपार दराने होणारी बिल रक्कम (बजेटकोड– C171A101A) यावर तरतूद उपलब्ध करून अदा करणेत येणार आहे व त्यांचेसमवेत करारनामा करणेत येणार आहे.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९६५ त्वर्य**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील सन २०२३–२४ या आर्थिक वर्षातील मिळकतकराची देयके, नोटीस, वारंट इ. मनपाच्या मागणीनुसार छपाई करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/कर आकारणी/१५८३,दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१) सन २०२२–२३ या आर्थिक वर्षातील मनपाच्या दप्तरी अंर्तभूत असलेल्या सुमारे १२.५० लाख मिळकतीच्या देयकाबरोबर उर्वरित आर्थिक वर्षातील वाढीव देयके, नव्याने प्रस्तावित २३ गावातील ३ लाख देयके व इतर ५० हजार असे एकूण १६ लाख मिळकतीची देयके व इतर ५ लाख त्याअनुषंगाने छपाई इ. आयसीआयसीआय बँक यांचेमार्फत सन २०२२–२३ मध्ये छापण्यात आलेल्या लोगो मागणीप्रमाणे सन २०२३–२४ चे पुणे मनपाच्या मिळकतकराच्या देयकावर समाविष्ट करून छपाई करून घेणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९६६ त्वर्य**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पूल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत मुंढवा स.नं. ६४ व अन्य मधील डि.पी. रस्ता महंमदवाडी स.नं. ४० ते ७६ डि. पी. रस्ता, महंमदवाडी स.नं. १ते ४ व ९६ येथील डि.पी. रस्ते महंमदवाडी स.नं. १२,१३व ५७ येथील डि.पी. रस्ते पीपीपी तत्वावर विकसित करण्यासाठी हाती घेणे आणि त्याअनुषंगाने प्री व पोस्ट टेंडर अॅक्टिवीटीकरिता तज्ञ सल्लागार नेमणूक करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१५८४, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

अ) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पूल खाजगी सहभागातून विकसित करणेअंतर्गत खालील कामे हाती घेणेस.

१) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पूल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी रामटेकडी इंडस्ट्रीयल इस्टेटपर्यंत स.नं. ४० ते स.नं. ७६ मधून जाणारा ३० मी. डी.पी. रस्ता व लगत असलेले १८ मी .डि.पी. रस्ते विकसित करणे.

२) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पूल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी स.नं. १,२,३,४, व ५७,५८,५९,९६ मधून जाणारा २४ मी .डि.पी. रस्ता विकसित करणे.

३) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पूल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी स.नं.१२,१३,३०,३२ व ५७ मधून जाणारा१८ मी. डी.पी. रस्ता विकसित करणे.

४) पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पूल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत मुंढवा रेल्वे स्टेशन परिसरातील स.नं.६४,६६,६७,६८,७१ मधील १२ मी. डी.पी. व २४ मी. डी.पी. असे एकूण ६ रस्ते विकसित करणे.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९६७ त्वर्य**

पुणे महानगरपालिका भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेअंतर्गत – आळंदी नगरपारिषदेस पाणीपुरवठा करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण १३ (पाणीपुरवठा) या मधीलकलम २०१ शहराबाहेर पाणी पुरविणेचा अधिकारनुसार मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पापु/१५८५, दि. १६/३/२०२३ चे पत्र.

१) मा. महापालिका आयुक्त यांचे विषयपत्रातील संदर्भ क्र. १२ नुसार सुधारित शासन निर्णयानुसार, सन २०१९ मध्ये ७ MLD पर्यंत व त्यापुढील १० वर्षात १०MLD पर्यंत वाढीव पाणी पुणे महानगरपालिकेमार्फत आळंदी नगरपरिषदेस कुरूळी टॅपींग येथून उपलब्ध करून देणेस.

**निर्णय– सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९६८ त्वर्य**

वारजे प्रभाग क्र.३०,स.नं.७९/ब येथील जागेत मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल खाजगी संस्था / चॅरीटेबल ट्रस्ट/भागीदारी संस्थेस डिसाई–बील्ट– फायनान्स – ऑपरेट– ट्रान्सफर (DBFOT) तत्वावर चालविण्यास देणेकामी पी.डब्ल्यू.सी. या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक केले असलेच्या बाबीस व पी.डब्ल्यू.सी. या संस्थेस राज्य शासनाच्या शासन निर्णयातील नमुद केलेल्या दरानुसार त्यांची फि आरोग्य खात्याकडील सन २०२२–२३ च्या अंदाजपत्रकातील पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना RE17F206 या

अर्थशिर्षकामधून र.रू.५० लाख खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा.स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१५८६, दि.१६/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक,आरोग्य कार्यालय, RE17F206,<br>पंडित दिनदयाळउपाध्याय अपघात विमा योजना | ५०लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका<br>वारजे प्रभाग क्र.३०,स.नं.७९/ब येथील जागेत मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल खाजगी संस्था / चॅरीटेबल ट्रस्ट/भागीदारी संस्थेस डिसाई-बील्ट- फायनान्स - ऑपरेट-ट्रान्सफर (DBFOT) तत्वावर चालविण्यास देणेकामी सल्लागार नियुक्त केलेल्या पी.डब्ल्यू.सी. या संस्थेस राज्य शासनाच्या शासन निर्णयातील नमुद केलेल्या दरानुसार त्यांची फि अदा करणे. | --- | ५०लक्ष |

**निर्णय- सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९६९ त्वर्य**

पुणे मनपाच्या के.पी.सी.टी.मॉल हॉस्पीटल, वानवडी आऊट सोर्सिंगद्वारे चॅरीटेबल ट्रस्ट / खाजगी वैद्यकीय संस्था / स्वयंसेवी संस्था यांना शासकीय दरात २८ वर्षे कालावधीकरीता चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या २ निविदापैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक 'उडान द लिफ ऑफ ड्रिम्स फाऊंडेशन' यांचेकडून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेसाठी खालील बाबींस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१५८७, दि.१६/३/२०२३ चे पत्र.

'उडान द लिफ ऑफ ड्रिम्स फाऊंडेशन', गाळा नं.४७ भोसले शिंदे आर्केड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ यांना पुणे मनपाच्या के.पी.सी.टी.मॉल हॉस्पीटल, वानवडी या जागेमध्ये पुणे मनपा संयुक्त विदयमाने पी.पी.पी. तत्वावर आय.सी.यु. जनरल वॉर्ड, ऑपरेशन थिएटर, रेडिओलॉजि विभाग, लॅब या सर्व सेवासुविधांकरीता (७) सात वर्षाच्या मुदतीच्या कराराने चालविणेस व त्यांची सेवा समाधानकारक असल्यास दर (७) सात वर्षाच्या टप्याने असे एकुण २८ वर्षे मुदतीकरीता चालविणेस देणेस.

'उडान द लिफ ऑफ ड्रिम्स फाऊंडेशन', गाळा नं.४७ भोसले शिंदे आर्केड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ यांचेकडून पुणे मनपाच्या के.पी.सी.टी.मॉल हॉस्पीटल,वानवडी या जागेमध्ये निविदेमध्ये सादर केलेल्या सी.जी.एच.एस.दराच्या मूळ रकमेवर १३ टक्के कमी दराने आय.सी.यु.जनरल वॉर्ड, ऑपरेशन थिएटर, रेडिओलॉजि विबाग, लॅब या सर्व सेवासुविधा उपलब्ध करून घेणेस.

'उडान द लिफ ऑफ ड्रिम्स फाऊंडेशन', गाळा नं.४७ भोसले शिंदे आर्केड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४ यांचेकडून सदरचा प्रकल्प पुणे मनपा संयुक्त विदयमाने (७) सात वर्षाच्या मुदतीच्या कराराने चालविणेस व त्यांची सेवा समाधानकारक असल्यास दर ( ७ ) सात वर्षाच्या टप्याने असे एकूण २८ वर्षे मुदतीकरीता चालविणेस देणेकामी आवश्यक तो करारनामा करणेस व संयुक्त प्रकल्पात कोणताही प्रश्न उदभवल्यास किंवा अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

**निर्णय- सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९७० त्वर्य**

प्रभाग क्र.१८ बालगुडे जीम येथे दुरूस्ती विषयक कामे करणेसाठी र.रू. १० लक्ष खालीप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/ भवन /१५८८, दि.१६/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग,<br>भांडवली कामे CE11A129/J1-18<br>१-मनपा भवन व मनपा इमारती बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाची नवीन प्रशासकीय इमारत बांधणे. | १० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>भवन विभाग<br>प्रभाग क्र.१८ बालगुडे जीम येथे दुरूस्ती विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |

**निर्णय- सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९७१ त्वर्य**

पुणे मनपा कार्यक्षेत्रात व नव्याने समाविष्ठ गावात डेंग्यू मलेरिया चिकुनगुन्या इत्यादी साथींच्या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी डास आळीनाशक पायरी प्रॉक्सीफेन ०.५GR (ग्रॅन्युअल) औषध खरेदी करणेसाठी र.रू.१ कोटी चे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१५८९ , दि.१६/३/२०२३ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक,आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका (RE17F121A) ठेकेदारी पद्धतीने नेमलेले सेवकांचे वेतन (Mosquio Free city) | १ कोटी | --- |
| **सुचविलेले काम**<br>आरोग्य कार्यालय, पुणे महानगरपालिका<br>७- रूग्णालये प्रसृतीगृहे औषणालये इ. (RE17F133C) रसायन व रिएजन्टस व कीटकनाशके वैद्यकीय उपकरणे, रिएजन्टस रसायने, कन्जुमेबल्स खरेदी करणेसाठी जंतुनाशक विषारी औषध खरेदी करणे. | --- | १ कोटी |

**निर्णय - सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१९७२ त्वर्य**

प्रभाग क्र.२० क मधील स.नं.५५ ताडीवाला रोड शूरवीर तरूण मंडळपुणे येथील बंद असलेली शौचालय पाडून त्याजागी समाज मंदिर बांधणेसाठी र.रू.३० लक्षचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१५९०, दि.१६/३/२०२३ चे पत्र.

प्रभाग क्र.२० क, मधील स.नं.५५ ताडीवाला रोड शूरवीरतरूण मंडख पुणे येथील बंद असलेली शौचालय पाडून समाज मंदिर बांधणे या कामासाठी र.रू.३० लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करून देणेस.

प्रभाग क्र.२० क मधील स.नं.५५ ताडीवाला रोड शूरवीर तरूण मंडळ पुणे येथील बंद असलेली शौचालय पाडून समाज मंदिर बांधणे या कामास वर्गीकरणाद्वारे उपलब्ध होणार या भरवश्यावर भवन विभागामार्फत निविदा प्रक्रिया राबविणेस.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक, भवन विभाग नदी पुनरूज्जीवन प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/ अनुदान/इतर वित्तीय माध्यमातूननदी व नदीकाठ विकसितकरणे/ सुधारणाकरणे) ( बजेटकोड-CE20D219/L2-11) | ३० लक्ष | --- |
| **नवीन सुचविलेले काम**<br>भवन विभाग<br>प्रभाग क्र.२० क मधील स.नं.५५ ताडीवाला रोड शूरवीर तरूण मंडळ, पुणे येथील बंद असलेली शौचालय पाडून त्याजागी समाज मंदिर बांधणे. | --- | ३० लक्ष |

**निर्णय- सदरचा विषय मान्य करून मा. मुख्यसभेकडे पाठविण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९७३ त्वर्य**

समान पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत खडकी येथे खडकी छावणी परिषद यांच्या जागेतून जलवाहिनी टाकण्यासाठी एकूण र.रू.६०,२४,७५०/- खडकी छावणी परिषद यांना आदा करणेस व तसेच त्यांचेसमवेत या कामाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेतर्फे आवश्यक तो करारनामा / हमीपत्र दाखल करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पा.पु./१५९१, दि.१६/३/२०२३ चे पत्र.

**निर्णय - सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. १९७४ त्वर्य**

पुणे मनपाच्या कमला नेहरू रूग्णालयात नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चर प्रस्थापित करून कार्यान्वित करणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस ( पुणे ) प्रा.लि. यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/माहिती व तंत्रज्ञान/१५९३, दि.१७/३/२०२३ चे पत्र.

१. मे. मोनार्च टेक्नॉलॉजीस( पुणे ) प्रा.लि. यांना सदर कामकाजाच्या निविदेतील अटी व शर्तीनुसार करारनामा करणेस व तदनुषंगाने कार्यादेश देणेस.
२. मे. मोनार्च टेक्नॉलॉजीस(पुणे) प्रा.लि. यांना कमला नेहरू रूग्णालयामध्ये नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरचे कामकाज करणेसाठी दिलेल्या साहित्यांच्या नगांची संख्या व मोजमापानुसार कमी जास्त खर्चाचे बिल आवश्यकतेनुसार व प्राप्त झालेल्या दरानुसार अदा करणेस.
३. तदनुषंगाने सद्यस्थितीत मे. मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा.लि. यांना पुणे मनपाच्या कमला नेहरू रूग्णालयामध्ये नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरचे प्रस्थापित करून कार्यान्वित करणे या कामकाजाचे रक्कम रू. ४३,००,०००/-(अक्षरी र.रू. त्रेचाळीस लाख फक्त) बिल अदा करणेस.

४. सदर कामासाठी होणारा खर्च भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय कॉलेज यांच्या खालील अर्थशिर्षकावर टाकणेस. CE17A242/SJ6-93 (सन २०२२–२३)

**निर्णय – सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**वृत्तांत मंजूर.**

**सही/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**